# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी- ४११०१८

क क्षेत्रीय कार्यालय

**सभावृत्तांत**

**कार्यपत्रिका क्र.२६**

(जुलै २०१९ ची मासिक सभा)

दिनांक: ०३/०७/२०१९ वेळ: दुपारी १२.०० वाजता

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.क प्रभग समितीची माहे जुलै २०१९ ची मासिक सभा बुधवार दिनांक ०३/०७/२०१९ रोजी दुपारी १२.०० वाजता क क्षेत्रिय कार्यालयाचे "श्री.छत्रपती शिवाजी महाराज सभागृह" येथे आयोजित करण्यात आली होती. सदर सभेस खालीलप्रमाणे सन्मा.नगरदस्य/ सदस्या उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १) | मा.बोइनवाड यशोदा प्रकाश | सभापती |
| २) | मा.लांडगे राजेद्र किसनराव | सदस्य |
| ३) | मा.समीर मोरेश्वर मासुळकर | सदस्य |
| ४) | मा.सागर सुखदेव हिंगणे | स्विकृत सदस्य |
| ५) | मा.वैशाली प्रशांत खाडये | स्विकृत सदस्या |

याशिवाय श्री.अण्णा बोदडे-क्षेत्रिय अधिकारी, श्री.राजीव घुले-प्र.प्रशासन अधिकारी, श्री.वसंत उगले-लेखाधिकारी, श्री.संजय घुबे-कार्यकारी अभियंता स्थापत्य, श्री.नितीन देशमुख-कार्यकारी अभियंता विद्युत, श्री.संदेश खडतरे-उपअभियंता नगररचना, श्री.प्रकाश साळवी-उपअभियंता नगररचना, श्री.कांबळे बी.बी.सहाय्यक आरोग्याधिकारी, श्री.शशीकांत दवंडे-उपअभियंता पा.पु, श्री.विनायक माने-उपअभियंता-स्थापत्य इ.अधिकारी उपस्थित होते.

मा.सभापती यांनी उपस्थित सन्मा.नगरसदस्य/सदस्या व अधिकारी/कर्मचारी यांचे स्वागत करून सभा कामकाज सुरू करणेस अनुमती दिली.

मा.सभापती यांचे परवानगीने खालील ऐनवेळेचे विषय सभा कामकाजात दाखल करून घेण्यात आले.

विषय क्र. १ : क्षेत्रिय अधिकारी यांचे पत्र क्र. कक्षेका/आ १५/कावि/ १७५/२०१९ दि.३/७/२०१९ सन २०१९-२० चे अंदाजपत्रकामध्ये औष्णीक धुरीकरणासाठी वाहन भाड्याने घेणे करीता अंतर्गत तरतूद वर्ग करणेबाबत.

विषय क्र. २ : मा.सारीका नितीन बोऱ्हाडे यांचा विषय
प्रभाग क्र.२ बो-हाडेवाडी येथील जुने सार्वजनिक शौचालय पाडणेबाबत.

विषय क्र. ३ : मा.राजेंद्र किसनराव लांडगे यांचा विषय
प्रभाग क्र.६ मधील धवडेवस्ती येथे नवीन नाम फलक लावण्यास मंजूरी मिळण्याबाबत.

**मा.सभापती** – सभा कामकाज सूरू करणेकामी आवश्यक गणसंख्या सभागृहात नसलेने सदरची सभा दिनांक ०७/०८/२०१९ रोजी ११.५० पर्यंत तहकुब करण्यात येत आहे.

सही/-
(बोइनवाड यशोदा प्रकाश)
सभापती (क प्रभाग समिती)
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

सही/-
प्रशासन अधिकारी
तथा सचिव (सभाशाखा)
क क्षेत्रीय कार्यालय

# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी- ४११०१८

क क्षेत्रीय कार्यालय

**सभावृत्तांत (कार्यपत्रिका क्र.२६)**

(दि. ३ जुलै २०१९ रोजीची तहकुब मासिक सभा)

दिनांक: ०७/०८/२०१९ वेळ: दुपारी ११.५५ वाजता

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.क प्रभग समितीची माहे जुलै २०१९ ची दिनांक ०३/०७/२०१९ रोजी तहकुब करणेत आलेली मासिक सभा बुधवार दिनांक ०७/०८/२०१९ रोजी सकाळी ११.५० वाजता क क्षेत्रिय कार्यालयाचे “श्री.छत्रपती शिवाजी महाराज सभागृह” येथे आयोजित करण्यात आली होती. सदर सभेस खालीलप्रमाणे सन्मा.नगरदस्य/ सदस्या उपस्थित होते.

१) मा.बोइनवाड यशोदा प्रकाश सभापती

२) मा.अश्विनी संतोष जाधव सदस्या

३) मा.लांडगे रवि लक्ष्मण सदस्य

४) मा.लांडगे राजेद्र किसनराव सदस्य

५) मा.लोंढे नम्रता योगेश सदस्या

६) मा.राहुल हनुमंतराव भोसले सदस्य

७) मा.समीर मोरेश्वर मासुळकर सदस्य

८) मा.धावडे गोपीकृष्ण भास्कर स्विकृत सदस्य

याशिवाय श्री.अण्णा बोदडे-क्षेत्रिय अधिकारी, श्री.दिलीप आढारी-प्रशासन अधिकारी, श्री.वसंत उगले-लेखाधिकारी, श्री.नितीन देशमुख- कार्यकारी अभियंता विद्युत, श्री.कांबळे बी.बी.सहाय्यक आरोग्याधिकारी, श्री.वाईकर-उपअभियंता ज.नि., श्री.विनायक माने-उपअभियंता-स्थापत्य, श्री.बाळु लांडे-उपअभियंता विद्युत, इ.अधिकारी उपस्थित होते.

मा.सभापती यांनी उपस्थित सन्मा.नगरसदस्य/सदस्या व अधिकारी/कर्मचारी यांचे स्वागत करून सभा कामकाज सुरू करणेस अनुमती दिली.

खालीलप्रमाणे सूचना मांडणेत आली.

सुचक: मा.समीर मोरश्वर मासुळकर अनुमोदक: मा.राहुल हनुमंतराव भोसले

भारताच्या माजी परराष्ट्र मंत्री मा.सुषमा स्वराज यांचे दुखद दिधन झाले आहे. त्यांना आजच्या सभेत श्रध्दांजली अर्पण करून आजची सभा तहकुब करण्यात यावी.

सदर सुचना सर्वानुमते मान्य करण्यात आली.

(उपस्थितांनी दोन मिनीटे स्तब्ध उभे राहुन श्रध्दांजली अर्पण केली)

**मा.सभापती** – आज होणारी प्रभाग समितीची सभा दिनांक ०४/०९/२०१९ रोजी ११.५० पर्यंत तहकुब करण्यात येत आहेत.

सही/-
(बोइनवाड यशोदा प्रकाश)
सभापती (क प्रभाग समिती)
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

सही/-
प्रशासन अधिकारी
तथा सचिव (सभाशाखा)
क क्षेत्रीय कार्यालय

# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी- ४११०१८

क क्षेत्रीय कार्यालय

**सभावृत्तांत (कार्यपत्रिका क्र.२६)**

(दि. ३ जुलै व ७ ऑगस्ट २०१९ रोजीची तहकुब मासिक सभा)

दिनांक: ०४/०९/२०१९ वेळ: दुपारी ११.५५ वाजता

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.क प्रभग समितीची माहे जुलै २०१९ ची दिनांक ०३/०७/२०१९ व दिनांक ७/८/२०१९ रोजी तहकुब करणेत आलेली मासिक सभा बुधवार दिनांक ०४/०९/२०१९ रोजी सकाळी ११.५० वाजता क क्षेत्रिय कार्यालयाचे "श्री.छत्रपती शिवाजी महाराज सभागृह" येथे आयोजित करण्यात आली होती. सदर सभेस खालीलप्रमाणे सन्मा.नगरदस्य/ सदस्या उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | मा.बोइनवाड यशोदा प्रकाश | सभापती |
| २. | मा.लोंढे नम्रता योगेश | सदस्या |
| ३. | मा.गीता सुशिल मंचरकर | सदस्या |
| ४. | मा.राहुल हनुमंतराव भोसले | सदस्य |
| ५. | मा.वैशाली ज्ञानदेव घोडेकर | सदस्या |
| ६. | मा.समीर मोरेश्वर मासुळकर | सदस्य |

याशिवाय श्री.अण्णा बोदडे-क्षेत्रिय अधिकारी, श्री.दिलीप आढारी-प्रशासन अधिकारी, श्री.वसंत उगले-लेखाधिकारी, श्री.संजय घुबे-कार्यकारी अभियंता स्थापत्य, श्री.नितीन देशमुख-कार्यकारी अभियंता विद्युत, श्री.कांबळे बी.बी.सहाय्यक आरोग्याधिकारी, श्री.वाईकर-उपअभियंता ज.नि., श्री.बाळु लांडे-उपअभियंता विद्युत, श्री.महेश बरिदे, श्री.विनायक माने, श्री.वैभव पुसाळकर – उपअभियंता स्थापत्य, श्रीम.केदारी अ.अ.- क्रिडा पर्यवेक्षक, श्री.माने एस.डी.-कनिष्ठ अभियंता स्थापत्या इ.अधिकारी उपस्थित होते.

मा.सभापती यांनी उपस्थित सन्मा.नगरसदस्य/सदस्या व अधिकारी/कर्मचारी यांचे स्वागत करून सभा कामकाज सुरू करणेस अनुमती दिली.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : | २ | विषय क्रमांक | : | १ |
| दिनांक | : | ०४/०९/२०१९ | विभाग | : | क प्रशासन/ लेखा |
| सुचक | : | मा.लोंढे नम्रता योगेश | अनुमोदक | : | मा. गीता सुशिल मंचरकर |

संदर्भ : मा.क्षेत्रीय अधिकारी, यांचेकडील पत्र क्रमांक इक्षेका/प्रशा/ ४/कावि/ ३/ २०१९ दिनांक २८/०६/२०१९

मनपाच्या सन २०१९-२० चे मुळ अंदाजपत्र तयार करीत असतांना मा. क्षेत्रीय अधिकारी यांचे वाहन इंधन (अधिकारी) या लेखाशिर्षामध्ये र.रु. १,१५,०००/- तरतुद करणेत आलेली आहे. सदर तरतुद मधुन सन २०१८-१९ ची वाहन इंधनाची बिले खर्ची टाकणेत आलेली आहेत. त्यामुळे माहे जून २०१९ अखेर र.रू.६,६४४/- शिल्लक असून सदरची तरतुद कमी पडणार आहे. त्याकरिता सार्वजनिक वाचनालय वृत्तपत्रे बिले या लेखाशिर्षावर र.रु.५,७५,०००/- असून त्यापैकी र.रु. १,७५,०००/- तरतुद वाहन इंधन (अधिकारी) या लेखाशिर्षावर वर्ग करणेस मान्यता देणेबाबत

विचार करणे.

सदरचा विषय दिनांक ३ जुलै २०१९ रोजी प्रभाग समितीचे सभेत मान्यतेकामी ठेवणेत आला होता, परंतु सदरची सभा कोरम अभावी तहकुब करण्यात आलेने व असदरचे विषयाची तातडी लक्षात घेता त्यास मा.स्थायी समितीची मान्यता घेतली असल्याने प्रभाग समितीतून सदरचा विषय माघारी घेण्यास मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य करण्यात आला

ऐनवेळेचे विषय

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : | ३ | विषय क्रमांक | : | २ |
| दिनांक | : | ०४/०९/२०१९ | विभाग | : | क आरोग्य / लेखा |
| सुचक | : | मा.राहुल हनुमंतराव भोसले | अनुमोदक | : | मा.वैशाली ज्ञानदेव घोडेकर |

संदर्भ : क्षेत्रिय अधिकारी यांचे पत्र क्र. कक्षेका/आ १५/कावि/ १७५/२०१९
दि.३/७/२०१९

मनपाच्या सन २०१९-२० चे मुळ अंदाजपत्रकामध्ये औष्णीक धुरीकरणासाठी वाहन भाड्याने घेणे या लेखाशिर्षकामध्ये र.रू.४,६०,०००/- इतकी तरतुद वर्ग करणेत आली आहे. सदरच्या तरतुदीमधून सन २०१८-१९ चे बील खर्ची टाकणेत आलेने माहे जून २०१९ अखेर र.रू. ९१,५५२/- शिल्लक आहे. त्यामुळे सदर लेखाशिर्षावर तरतूद कमी पडणार आहे. त्याकरीता खाजगीकरणाद्वारे साफसफाई या लेखाशिर्षकावर र.रू. ७,०९,००,०००/- असून त्यापैकी र.रू.६,००,०००/- तरतूद औष्णीक धूरीकरणासाठी वाहन भाड्याने घेणे या लेखाशिर्षावर वर्ग करणेस मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य करण्यात झाला

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : | ४ | विषय क्रमांक | : | ३ |
| दिनांक | : | ०४/०९/२०१९ | विभाग | : | क आरोग्य / स्थापत्य |
| सुचक | : | मा.लोंढे नम्रता योगेश | अनुमोदक | : | मा. गीता सुशिल मंचरकर |

संदर्भ : मा.सौ.सारीका नितीन बो-हाडे यांचे दिनांक ३/७/२०१९ चे पत्र
मा.सभापती यांनी शिफारस केलेप्रमाणे.

प्रभाग क्र.२ बो-हाडेवाडी गट नं. १ सिल्हर हॉटेल जवळ, दिपक निम्हण यांचे घराशेजारी असणारे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे ३५ वर्षापूर्वीचे सद्यस्थितीत बंद असलेले व मोडकळीस आलेले जुने धोकादायक सार्वजनिक स्वच्छतागृह पाडणेत यावे अशी नागरीकांची मागणी आहे. तसेच स्वच्छ भारत अभियान अंतर्गत तेथील नागरीकांना वैयक्तिक शौचालये उपलब्ध करून देणेत आलेली आहे. त्यामुळे सदर शौचालय पाडून त्याठिकाणी उपलब्ध असलेल्या मनपाच्या जागेवर सांस्कृतिक हॉल बांधणेस मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य करण्यात आला

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : | ५ | विषय क्रमांक | : | ४ |
| दिनांक | : | ०४/०९/२०१९ | विभाग | : | स्थापत्य |
| सुचक | : | | अनुमोदक | : | |

संदर्भ : मा.राजेंद्र किसनराव लांडगे यांचे दिनांक ३/७/२०१९ चे पत्र
मा.सभापती यांनी शिफारस केलेप्रमाणे.

प्रभाग क्र.६ धावडेवस्ती मध्ये कै.गजानन वेणुजी लांडगे या नावाने दोन फलक लावणेस मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य करण्यात आला

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : | ६ | विषय क्रमांक | : | ५ |
| दिनांक | : | ०४/०९/२०१९ | विभाग | : | स्थापत्य |
| सुचक | : | मा.समीर मासुळकर | अनुमोदक | : | मा.यशोदा प्रकाश बोइनवाड |

संदर्भ : मा.यशोदा प्रकाश बोइनवाड यांचे दिनांक ३/७/२०१९ चे पत्र
मा.सभापती यांनी शिफारस केलेप्रमाणे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या क प्रभाग समितीचे मान्यतेने मा. क प्रभाग समितीची मासिक सभा प्रत्येक महिन्याचे पहिल्या बुधवारी करण्यात येते. तथापी मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा ही प्रत्येक बुधवारी घेणेबाबतचा ठराव मा.स्थायी समितीने पारीत केला असलेने मा.क प्रभाग समितीची मासिक सभा ही प्रत्येक महिन्याचे पहिल्या मंगळवारी सकाळी ११.३० वाजता आयोजित करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य करण्यात आला

यानंतर उपस्थितांचे आभार व्यक्त करून मा.सभापती यांनी सभा संपलेचे जाहीर केले.

सही/-
(बोइनवाड यशोदा प्रकाश)
सभापती (क प्रभाग समिती)

सही/-
प्रशासन अधिकारी
तथा सचिव (सभाशाखा)
क क्षेत्रीय कार्यालय

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, क क्षेत्रीय कार्यालय
जा.क्र. कक्षेका/सभा/कावि/ ११४ /२०१९
दिनांक : २४ /०९/२०१९
प्रत: सर्व संबंधित शाखा प्रमुख व शाखाधिकारी

सभावृत्तांतामधील ठरावानुसार आपले विभागाशी संबंधित विषयाबाबत योग्य ती नियमाधिन कार्यवाही करणेत यावी. याबाबत वेगळा पत्रव्यवहार केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.